# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या उपस्थिती भत्त्यात वाढ करण्याबाबत

**(१) ३१२३ (२८-०५-२०२०) श्री.नागोराव गाणार : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ७२७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी दिनांक ३ जानेवारी, १९९२ रोजीपासून सुरु करण्यात आलेल्या उपस्थिती भत्ता योजनेनुसार पहिली ते चौथी मधील जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपरिषदांमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळेतील आदिवासी क्षेत्राव्यतिरिक्त राज्याच्या अन्य भागातील अनुसूचित जाती-जमाती, भटक्या जमाती आणि विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषेखालील विद्यार्थीनीना शाळेतील उपस्थितीच्या प्रत्येक दिवसासाठी मागील २८ वर्षांपासून केवळ १ रुपया एवढा उपस्थिती भत्ता शासनामार्फत दिल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी २८ वर्षाचा कालावधी होऊनही सदरहू उपस्थिती भत्त्याच्या रक्कमेत वाढ न झाल्यामुळे या रकमेत वाढ करण्यात यावी यासाठी विद्यार्थीनींच्या पालकांनी शासनाकडे अनेकदा मागणी करुनही उपस्थिती भत्त्याच्या रकमेत वाढ करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक शिक्षण विभागाने सदर उपस्थिती भत्त्यात वाढ करण्याबाबत प्रशासनास पत्रव्यवहार केला असून ग्रामिण भागातील मुलींच्या शाळेतील उपस्थितीचे प्रमाण वाढवुन त्यांना आर्थिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनविण्याकरीता इतर कोणत्या योजना राबविण्याचे शासनातर्फे विचाराधीन आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाढती महागाई लक्षात घेता तसेच दुर्गम भागातील मागास विद्यार्थिनींची शासकीय शाळांमध्ये संख्या वाढविण्याच्यादृष्टीने जिल्हा परिषद महानगरपालिका, नगरपरिषदांच्या शाळेत शिकणाऱ्या गरिब विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या उपस्थिती भत्त्यात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२७-०५-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) उपस्थिती भत्ता या योजनेनंतर केंद्र/राज्य पुरस्कृत मध्यान्ह भोजन योजना, मोफत पाठयपुस्तके योजना व मोफत गणवेष योजना सुरू करण्यात आल्या.

तसेच मानव विकास मिशन मार्फत मुलींना मोफत सायकल वाटप योजना राबविण्यात येते. मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण योजनाही राबविण्यात येत आहे.

तसेच मुलींसाठी कस्तुरबा गांधी विद्यालय व वस्तीगृह अश्या नवीन योजना सुरू करण्यात आल्या आहेत. याशिवाय मुलां-मुलींसाठी एकत्रित योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. उदा. RTE अंतर्गत खाजगी शाळेत २५% प्रवेश इ.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

# कोरोना वायरसच्या काळात निकृष्ट दर्जाच्या सुपारीचा अवैध व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(२) ४६९० (०८-०९-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३९२ ला दिनांक २० मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना वायरसच्या संसर्ग काळात लॉकडाऊनमध्ये दिनांक ५ मे, २०२० रोजी १३ लाखाची व ४ जून, २०२० रोजी ९३ लाखाची निकृष्ट दर्जाची सुपारी जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉकडाऊनमध्ये तीन महिन्यात चार वेळा सुपारी जप्तीची कार्यवाही झाली असूनही निकृष्ट दर्जाच्या सुपारीच्या अवैध व्यवसायावर शासन नियंत्रण ठेवण्यासाठी अपयशी ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वर्षभर सातत्याने होत असलेल्या निकृष्ट दर्जाच्या सुपारीच्या कार्यवाहीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२७-०५-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासन, नागपूर कार्यालयाकडून माहे मे व जुन २०२० मध्ये एकूण ९ धाडी टाकण्यात आलेल्या आहेत आणि एप्रिल,मे,जुन व जुलै २०२० या महिन्यांमध्ये एकूण १,५६,७६८ किलोचा (रुपये ३,७३,०६,७७२/- किंमतीचा) सुपारीचा साठा जप्त करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अन्न व औषध प्रशासनातर्फे दिनांक १ एप्रिल २०२० ते १५/११/२०२० या कालावधीमध्ये २० वेगवेगळ्या अन्न आस्थापनांवर धाडी टाकून १६०७३० किलो रुपये ३,८१,०६,१५३/- किंमतीचा सुपारीचा साठा जप्त करण्यात आलेला असून एकूण ४९ नमुने विश्लेषणास्तव घेण्यात आले आहेत. त्यापैकी १६ नमुने प्रमाणित, १७ नमुने कमी दर्जाचे, ८ नमुने असुरक्षित असल्याचे अहवाल प्राप्त झाले आहेत. उर्वरीत ८ नमुन्याचे अहवाल प्रलंबित आहेत.

१७ कमी दर्जाच्या नमुन्यापैकी १ प्रकरणु न्यायनिर्णयाकरीता प्रलंबित आहे. उर्वरीत १६ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. ८ असुरक्षित नमुन्यापैकी ४ प्रकरणी फौजदारी खटला दाखल करण्यात येत आहे तर ४ प्रकरणी चौकशी प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत

**(३) ५३८६ (१८-११-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराच्या ओझ्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने दप्तरांचे ओझे कमी करण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करण्याची बाब दीर्घकालापासून शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने याबाबत राज्य शासनास काही सूचना दिलेल्या आहेत काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२७-०५-२०२२) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

शासनाच्या दिनांक २१/०७/२०१५ चा शासन निर्णय व दिनांक ०५/११/२०१५ च्या परिपत्रकान्वये उपाययोजना व सूचना देण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या वजनापेक्षा दप्तराचे ओझे १० टक्के पेक्षा अधिक असू नये याची दक्षता घेऊन सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत व शाळांमार्फत अंमलबजावणी होत आहे.

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या स्कुल बॅग धोरण, २०२० मध्ये इयत्ता १ ली पर्यंत दप्तरच नाही व इयत्ता पहिली ते बारावी पर्यंत इयत्तानिहाय अपेक्षित वजन निश्चित केले आहे.

तसेच राज्यात वर्ष २०२०-२१ पासून "एकात्मिक पाठ्यपुस्तक योजना" हा पथदर्शी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. ह्या प्रकल्पात मुलांचे दप्तराचे ओझे १/३ होणार आहे.

राज्यातील ६६ ब्लॉक्समध्ये व संपूर्ण जालना जिल्ह्यासह हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोयदापाडा, वसई (जि.पालघर) येथे अनधिकृत गुटखा साठवणूक करणाऱ्या गोदामांवर कारवाई करण्याबाबत

**(४) ५९५६ (१३-१२-२०२०) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोयदापाडा, वसई (जि.पालघर) येथे वालीव पोलीस ठाण्याकडून अनधिकृत गुटखा साठवणूक करणाऱ्या गोदामांवर धाड टाकून कारवाई करण्यात आल्याचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त धाडीत किती गुटखा जप्त करण्यात आला,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२७-०५-२०२२) :** (१) हे खरे आहे.

सदर धाडीत वालीव पोलीस ठाण्याकडून एकूण रुपये १,८०,९४०/- किंमतीचा गुटखा सदृष्य तंबाखूजन्य पदार्थाचा साठा जप्त करण्यात आलेला आहे.

(२) उक्त प्रकरणी वालीव पोलीसांद्वारे छापा टाकून कारवाई करण्यात आली आहे. दोषींविरुध्द भारतीय दंड विधान कलम आणि अन्न व सुरक्षा मानके अधिनियम, २००६ अंतर्गत गुन्हा दाखल केला असून त्यात ०१ आरोपीस अटक करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या गैरवर्तनाबाबत

**(५) ९१२८ (१४-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई येथील तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती शालीनी शर्मा यांनी नागपाडा व सध्या कार्यरत असलेल्या चेंबूर पोलीस ठाणे अंतर्गत कोरोना साथीच्या काळात व्यापारी, दुकानदार, आणि सामान्य नागरिकांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन धमक्या देणे, जुन्या गाड्यांचा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायांकडून पैशाची मागणी करून धमकावणे, नागरिकांना विनाकारण मारहाण करणे, जीवे मारण्याची धमक्या देणे, लाच घेणे यासारखे नाहक त्रास देण्यात येत असल्याच्या निषेधार्थ स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मा.मुख्यमंत्री व मा.गृहमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रारी व आंदोलने केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना काळात नागपाडा व चेंबूर येथील परप्रांतिय श्रमिक/मजुर मुंबई शहरातून स्थलांतरित होत असताना प्रवासी मजुरांच्या समस्येबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी विचारपूस करीत असताना उक्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी लोकप्रतिनिधींसोबत राजशिष्टाचाराचा कोणताही नियम न पाळता गैरवर्तवणूक करणे, शाब्दीक कलह करुन अपमान करणे, तसेच त्यांचेवर खोटे गुन्हे दाखल केल्याचे दिनांक २७ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदाचा गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द लोकप्रतिनिधींनी विशेष हक्कभंगाची सूचना सादर केली असून अशाप्रकरे बेजबाबदार व गैरवर्तन असणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना देण्यात आलेला राष्ट्रपती पदक परत घेवून त्यांचेवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू वरिष्ठ पोलीस निरीक्षकांविरुध्द अनेक तक्रारी असताना त्यांचेवर कारवाई करण्याऐवजी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्यांना पाठीशी (सहकार्य) घालण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोरोना काळात नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेवर गैरवर्ततन, नागरिकांना मारहाण करणे, नाहक त्रास देणे, लाच घेणे इ. प्रकरणी त्यांचेवर कारवाई करुन त्यांना सेवेतून निलंबित करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१२-०५-२०२२)** : (१) निनावी अर्जदार-रहिवाशी नागपाडा परिसर मुंबई यांनी व.पो.नि. शालिनी शर्मा यांचे विरुध्द दाखल केलेल्या भ्रष्टाचारा बाबत तक्रारीचे अनुषंगाने तात्कालीन सपोआ ताडदेव, मुंबई यांनी केलेल्या चौकशीतअंती तक्रारीत तथ्य नसल्याचे आढळून आले आहे.

याव्यतीरिक्त अन्य तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक शालीनी शर्मा यांचे विरुध्द गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि. गु.र.क्र. ०९/२०२२ कलम ३८९, ३८५, ५०६, ३४ भादविसं (चेंबुर पोलीस ठाणेस गु.र.क्र. ३१/ २०२२) गुन्हा दाखल करण्यात आला असून सद्य:स्थितीत तो तपासाधीन आहे.

(२) दिनांक २७/०५/२०२० रोजी कोरोना साथ काळात नागपाडा पोलीस ठाणेचे हद्दीत परप्रांतिय मजूरांना त्यांचे गावी स्थलांतरीत करण्यात येणार होते. तथापि, रेल्वे प्रशासना कडून अचानक काही रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्याने सदर गर्दी झाली होती. त्यादरम्यान पोलीस प्रशासनाची कोणतीही

पूर्व परवानगी न घेता, सामाजिक अंतर न राखता जमावबंदी आदेशाचे उल्लघंन केले प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासाधीन आहे.

(३), (४) व (५) निनावी अर्जदार-रहिवाशी नागपाडा परिसर मुंबई यांनी व.पो.नि. शालिनी शर्मा यांचे विरुध्द दाखल केलेल्या भ्रष्टाचारा बाबत तक्रारीचे अनुषंगाने तात्कालीन सपोआ ताडदेव, मुंबई यांनी केलेल्या चौकशीतअंती तक्रारीत तथ्य नसल्याचे आढळून आले आहे. याव्यतीरिक्त अन्य तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक शालीनी शर्मा यांचे विरुध्द गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि. गु.र.क्र. ०९/२०२२ कलम ३८९, ३८५, ५०६, ३४ भादविसं (चेंबुर पोलीस ठाणेस गु.र.क्र. ३१/ २०२२) गुन्हा दाखल करण्यात आला असून सद्य:स्थितीत तो तपासाधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या थकीत मानधनाबाबत

**(६) १०५६१ (०६-०१-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अशासकीय अनुदानित महाविद्यालयात शिक्षकांची पदे रिक्त असल्याने तासिका तत्वावर प्राध्यापकाच्या नेमणुका केल्या जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष सन २०२०-२०२१ माहे नोव्हेंबर, २०२० पासून सुरु झाले असून प्रत्येक विद्यापीठाने पात्रता धारक तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्तीस माहे नोव्हेंबर, २०२० पासून मान्यता दिल्या असून त्या पदावर प्राध्यापक कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सहसंचालक, उच्च शिक्षण औरंगाबाद यांनी दिनांक ०१ जून, २०२१ रोजीच्या पत्रान्वये विभागातील अनुदानित महाविद्यालयांना दिनांक २४ फेब्रुवारी, २०२१ ते दिनांक ३१ मे, २०२१ या कालावधीची देयके आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करण्याबाबत सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सीएचबी प्राध्यापक माहे नोव्हेंबर, २०२० पासून प्रत्यक्ष कार्यरत असून त्यांना विद्यापीठाची मान्यता असून त्यांना ३ महिन्याचेच मानधन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शैक्षणिक वर्ष माहे नोव्हेंबर, २०२० ते दिनांक ३१ मे, २०२१ पर्यंतचे तासिका तत्वावरील प्राध्यापकांचे मानधन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०६-०६-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक नियुक्तीची प्रक्रिया ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून सेवानिवृत्ती, मृत्यू, राजीनामा इत्यादी कारणाने पद रिक्त झाल्यास पदभरती होईपर्यंत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ च्या आदेशातील तरतुदीनुसार तासिका तत्वावर प्राध्यापकांच्या नेमणूका करण्यात येतात.

सदरच्या नेमणुका प्रत्यक्ष उपलब्ध कार्यभार तपासून एका पूर्णवेळ रिक्त पदाकरीता फक्त दोनच अध्यापकांना एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त ०९ महिन्यांसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात संबंधित विद्यापीठाच्या मान्यतेने करण्यात येतात

(२) हे अंशत: खरे आहे.

कोविड-१९ या महामारीच्या पार्श्वभुमीवर पार्श्वभुमीवर तासिका तत्वावरील प्राध्यापक पदभरतीची प्रक्रिया पूर्ण करणे महाविद्यालयांना शक्य होत नसल्याने शासनाच्या दिनांक २३/०२/२०२१ च्या पत्रान्वये “शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये ज्या अध्यापकांच्या तासिका तत्वावरील नियुक्त्या विहीत मार्गाने झालेल्या आहेत, त्यांना अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात प्रचलित नियमातील विहीत तरतूदींचे पालन करून केवळ सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापुरतीच मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने शासनाचे दिनांक २३/२/२०२१ चे पत्र निर्गमित होण्यापुर्वी तासिका तत्वावरील अध्यापकांना माहे नोव्हेंबर, २०२० पासून मान्यता दिलेली आहे. त्यामुळे या विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील तासिका तत्वावरील अध्यापकांबाबत नियुक्ती माहे नोव्हेंबर २०२० व मानधन माहे फेब्रुवारी २०२१ पासून दिले गेले असल्याचे दिसून येते. मात्र प्रत्यक्ष आर्थिक लाभ देण्याबाबत संचालनालयाचे पत्र दिनांक २३/२/२०२१ नुसार कार्यवाही करण्यात आली असल्याचे विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग यांनी कळविले आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

याबाबत शासनाच्या दिनांक २३/२/२०२१ मधील निर्देशानुसार कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर सन २०२०-२१ या संपूर्ण शैक्षणिक वर्षाकरीता तासिका तत्वावर नियुक्ती करावयाच्या अध्यापकांना शासनाच्या दिनांक १४/११/२०१८ मधील नमूद अट क्रमांक-५ च्या तरतूदीची पुर्तता होत असल्यास त्यांनी केलेल्या कामाच्या सुपूर्ण कालावधीचे मानधन अदा करण्यात येत आहे.

---

## औरंगाबाद महानगरपालिकेची हदद वाढविण्याबाबत

**(७) १०६०१ (०५-०१-२०२२) श्री.अंबादास दानवे** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेची हद्द वाढविण्याबाबतचा प्राथमिक अहवाल सिडको प्रशासनाकडून तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालात महानगरपालिका हददीत कोणकोणत्या गावांचा समावेश करण्यात आला आहे तसेच सिडको क्षेत्रात असलेल्या गावांचा देखील सदर अहवालात विचार करण्यात येणार असल्याने उक्त प्रकरणी विविध शासकीय कार्यालयांच्या प्रमुखांची एक समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने आपला अंतिम अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०६-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

औरंगाबाद महापालिकेलगत सिडकोने विकसित केलेल्या वाळुज महानगर प्रकल्पातील नगर-१, नगर-२, व नगर-४ चे स्थानिक स्वराज संस्था म्हणून भौतिक व सामाजिक सेवा-सुविधांचे पुढील देखभालीकरीता वर्ग करुन घेणेबाबत सिडकोने दिनांक २८/१२/२०२० रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस विनंती केली आहे. त्यासंदर्भात सिडको व महानगरपालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांची दिनांक ८/०९/२०२१ रोजी समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे सोनगांव (ता.जि.सातारा) येथील दुमाला जमिनीचे संगणीकृत ७/१२ वर इतर हक्कात नमूद केलेला शेरा रद्द करणेबाबत

**(८) ११३६४ (०५-०१-२०२२) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सोनगांव (ता.जि.सातारा) येथील सर्व जमिनीचे दिनांक ३१ जानेवारी, २०१८ चे शासन आदेशानुसार जमिनीचे हस्तलिखित ७/१२ चे संगणीकृत ७/१२ तयार करतांना झालेल्या चुकीची दुरुस्ती महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ प्रमाणे दुरुस्ती करावी, याबाबत दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ च्या आदेशानुसार दुरुस्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशात अन्य भोगवटादारांचे नोंदीवर कोणताही परिणाम होणार नसल्याचे नमूद करण्यात आले असताना गावकामगार तलाठी यांनी नोटीस फेरफार न देता नोटीस बजावल्याची तारीख नोटीस न देताच नमूद केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नोटीस शेतकऱ्यांना पूर्व परवानगी न घेता संगणकीकृत ७/१२ वर इतर हक्कात सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरास बंदी असा शेरा नमूद करण्यात आल्यामुळे तहसिलदार, सातारा यांचे आदेशाची वेगवेगळे फेरफार करून अंमलबजावणी करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरच्या शेऱ्यामुळे या गावातील एकूण ६१८ खातेदारांना अडचणी निर्माण झाल्यामुळे त्या शेतकऱ्यांना अल्पमुदतीचे पीक कर्ज वि.का.स.सेवा सोसायटी कडून न मिळणे तसेच बँकेमार्फत घर बांधणे, गोठा बांधणे, विहीर खुदाई, पाईपलाईन करणे अशा प्रकारच्या शेती सुधारणेसाठी मिळणारी दिर्घ मुदतीची कर्जे मिळत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणी निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांची पूर्व परवानगी न घेता दुमाला जमिनीचे संगणकीकृत ७/१२ वर इतर हक्कात नमुद केलेला शेरा रद्द करण्यात यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या मागणीप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (३१-०५-२०२२) :** (१), (२), (३) व (४) मौजे सोनगाव लिंब ता.जि.सातारा येथील दुमाला मिळकतीच्या ७/१२ संगणीकरणादरम्यान दुमला मिळकतीच्या संगणीकृत ७/१२ मध्ये भोगवटादार वर्ग १ असा भुधारणा प्रकार नमुद झाल्याचे निदर्शनास आल्याने तहसिलदार, सातारा यांनी दिनांक २६/११/२०१८ रोजीच्या आदेशान्वये दुमाला मिळकतीच्या हस्तलिखित ७/१२ प्रमाणे संगणीकृत ७/१२ मध्ये दुरुस्ती करण्याचाआदेश दिला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कमल १५५ अन्वये निर्गमित केला आहे. आदेशावरुन नोंद घेताना फेर नोटिस काढण्याची तरतुद नसल्याने खातेदारांना नोटीस न बजावता सदर आदेशानुसार नोंद प्रमाणित करण्यात आली आहे. सदर आदेशानुसारच संगणकीकृत ७/१२ मध्ये दुरुस्ती करण्यात आली असून, दुरुस्ती करताना संगणकीय प्रणालीमध्ये मूलभूतरित्या (By Default) हितसंबंधितांना नोटीस बजावल्याचा दिनांक असा शेरा संगणकीय फेरफार प्रणालीमध्ये नमुद झालेला आहे.

सदर मिळकतींच्या हस्तलिखित ७/१२ ला दुमाला असा भोगवटा वर्ग नमूद आहे. तथापि, संगणकीय प्रणालीमध्ये दुमाला हा भोगवटा वर्ग उपलब्ध नसून भोगवटा वर्ग-२ या प्रकारामध्ये एकूण १४ प्रकार उपलब्ध असून त्यानुसार सदर जमीनीच्या संगणकीय ७/१२ मध्ये भोगवटादार वर्ग २ (देवस्थान ईनाम जमीनी) हा प्रकार निवडण्यात आलेला आहे.

तथापि, सदर प्रकरणी शासनाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने फेर तपासणी करण्यात आली असून सदर जमीनी खाजगी इनाम वर्गाचे असल्याचे आढळून आले आहे. त्यानुसार प्रस्तुत ६२४ गटांच्या इतर हक्कात असलेला “देवस्थान इनाम जमीन” हा शेरा वगळण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम १५५ नुसार विहित कार्यवाही अवलंबून दुरुस्ती करण्याची कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे येथे कर्करोग रुग्णालय (कॅन्सर हॉस्पिटल) उभारण्याबाबत

**(९) ११४२८ (२०-११-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील माजिवडा येथील रुस्तमजी गृह संकुल परिसरातील टाऊन सेंटरच्या इमारतीमध्ये कर्करोग रुग्णालय (Cancer Hospital) उभारण्यास शासनाच्या नगरविकास विभागाने ठाणे महानगरपालिकेस मंजुरी दिली असल्याचे दिनांक २२ जून,२०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिका, टाटा मेमोरियल सेंटर, जितो एज्युकेशनल व मेडिकल ट्रस्ट यांच्या माध्यमातून सदर कर्करोग रुग्णालय (कॅन्सर हॉस्पिटल) ३० वर्षाच्या कालावधीसाठी केवळ १ रुपया नाममात्र भाडे तत्वावर दराने चालविण्यात येणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात येणार असून या करारनाम्याचा अंतिम मसुदा अद्याप तयार झाला नसल्याचे दिनांक १४ जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे येथे कर्करोग (कॅन्सर हॉस्पिटल) रुग्णालय उभारण्याची आवश्यकता विचारात घेता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०६-२०२२) :** (१) व (२) ठाणे महानगरपालिका, टाटा मेमोरियल सेंटर व मे.जितो एज्युकेशनल ॲण्ड मेडीकल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापन करावयाच्या कर्करोग रुग्णालयासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ (ग) नुसार ठाणे महानगरपालिकेच्या मालकीची स्थावर मालमत्ता प्रतिवर्ष रुपये १/- इतक्या सवलतीच्या दराने उपलब्ध करुन देण्याबाबत शासन निर्णय दिनांक २१/०६/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(३) व (४) होय.

तथापि, शासन निर्णय दिनांक २१/०६/२०२१ च्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने यापूर्वी स्वाक्षरी करण्यात आलेल्या त्रिपक्षीय सामंजस्य करारनाम्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक होते.

सदरच्या पुरवणी करारनाम्याच्या मसूद्याला ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दिनांक १७/०८/२०२१ अन्वये मंजुरी दिली आहे व त्यानुसार त्रिपक्षीय सामंजस्य करारनाम्यावर माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये तिन्ही पक्षांच्या स्वाक्षऱ्या झाल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील गारगाव आदिवासी शासकीय आश्रमशाळा इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(१०) ११७२३ (०५-०१-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गारगाव तसेच गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) येथील आदिवासी शासकीय आश्रमशाळा इमारतीचे बांधकाम गत ७ वर्षांपासून आजमितीपर्यंत अपूर्णावस्थेत असल्याने शाळेतील काही वर्ग जुन्या इमारतीच्या आवारात भरवण्यात येत असल्याची माहिती दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने सदरहू आश्रमशाळा इमारतीचे बांधकाम अपूर्णावस्थेत ठेवणाऱ्या ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२६-०५-२०२२) :** (१) इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याने काही वर्ग जुन्या इमारती च्या आवारात भरविण्यात येत आहे, हे खरे आहे.

(२) व (३) गुहिर येथील आश्रमशाळा व वसतिगृह इमारतींची बांधकामे ठेकेदाराकडून संथ गतीने प्रगतीत असून कामाच्या दर्जाबाबत साशंकता उपस्थित केल्याने ही कामे मूळ कंत्राटदाराकडून काढून त्याने केलेल्या कामातील त्रुटी त्याच्या जबाबदारी व जोखीमीवर (risk & cost) दुरुस्त करण्याचे प्रस्तावित आहे. उर्वरित कामासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबवून निधीचे उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच गारगाव येथील कामाचा उपलब्ध आर्थिक वाव विचारात घेऊन शाळा इमारतीचे बांधकाम मे, २०२२ अखेरीस पूर्ण करण्याचे नियोजन आहे. वसतिगृहाचे उर्वरित बांधकाम मे, २०२२ च्या अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित करण्यात येत आहे.

---

## राज्यातील अनेक विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांना वेतन अदा करण्याबाबत

**(११) ११७३१ (०५-०१-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांना मागील अनेक महिने संस्थांनी वेतन दिले नसल्याने त्यांना त्यांच्या आर्थिक समस्या सोडविण्यासाठी भाजी विकणे, रिक्षा चालवणे व इतर कामे करावी लागत असल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रमाच्या प्राध्यापकांना संस्थेकडून रुपये ५ ते १० हजार देण्यात येत असून सदरहू रक्कमही दरमहा नियमित मिळत नसल्याने याबाबत संबंधित विद्यापीठे, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, तंत्र शिक्षण महाविद्यालयांचे नियमन करणारी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, विद्यापीठ अनुदान आयोग अशा सर्व प्राधिकरणांकडे प्राध्यापकांनी तक्रारी केल्या आहेत, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नूसार राज्यातील अनेक विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांना मागील अनेक महिने वेतन न देणाऱ्या संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.उदय सामंत (०६-०६-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

कायम विनाअनुदानित महाविद्यालयामधील कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित संस्थेची आहे.

तथापि, कोविड-१९ च्या महामारीच्या काळात राज्यातील विद्यापीठ संलग्नित असलेल्या विनाअनुदानित महाविद्यालयांतील तसेच अनुदानित महाविद्यालयातील विनाअनुदानित विभागातील शिक्षकांच्या वेतनाबाबतच्या तक्रारी काही विद्यापीठांस प्राप्त झाल्या असून, या तक्रारीबाबत विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांची सत्यशोधन समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने संबंधित महाविद्यालयांना/ संस्थांना तक्रारकर्ते शिक्षकांविरूध्द कोणतीही दंडात्मक कारवाई न करता त्यांना देय होणारे वेतन/ थकीत वेतन त्वरीत अदा करण्याबाबत विद्यापीठ स्तरावरून सूचीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तळोजा (नवी मुंबई) येथील कारागृहात कैद्यांच्या दोन गटांमध्ये हाणामारी झाल्याबाबत

**(१२) ११७८१ (३०-०३-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोजा (नवी मुंबई) येथील कारागृहात कैद्यांच्या दोन गटांमध्ये हाणामारी झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हाणामारीत एक कैदी गंभीर जखमी झाला असून त्याला जे.जे. रुग्णालयात उपचाराकरीता दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०६-०६-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे. दिनांक ३०/१२/२०२१ रोजी किरकोळ कारणास्तव हाणामारी झाली आहे.
(२) बंदी फैयाज खालीद शेख याला जखम झाल्यामुळे वैद्यकीय तपासणीसाठी सर.जे.जे.समूह रुग्णालय, मुंबई येथे दिनांक ३०/१२/२०२१ रोजी पाठविण्यात आले होते. परंतु सदर बंद्याला गंभीर जखम नसल्यामुळे आंतररुग्ण म्हणून दाखल करुन घेतले नाही.
(३) याबाबत सहभागी असलेल्या बंद्यावर खारघर पोलीस ठाणेमध्ये गु.र.क्र.०४४५/२०२१ नुसार भादंवि कलम १४३,१४७,१४९,३२४,५०४ व १६० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेतील न्यायाधीन बंदी फैयाज खालीद शेख याला कल्याण जिल्हा कारागृह व न्यायाधीन बंदी अर्जुन काशीनाथ सावंत यास ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे येथे सुरक्षा व प्रशासकीय कारणास्तव वर्ग करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजशिष्टाचारासाठी राखीव असलेल्या आणि मुख्यमंत्र्यांच्या संमतीने राज्य अतिथीसाठी साठी वापरण्यात येणाऱ्या मोटारीचा जीटीएस नियंत्रकांने गैरव्यवहार केल्याबाबत

**(१३) १२०३८ (३०-०३-२०२२) श्री.महादेव जानकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **राजशिष्टाचार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजशिष्टाचारासाठी राखीव असलेल्या आणि मा.मुख्यमंत्र्यांच्या संमतीने राज्य अतिथीसाठी वापरण्यात येणाऱ्या मोटारीचा जीटीएस नियंत्रकांकडूनच खाजगी कामासाठी वापर करण्यात आल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन जीटीएस नियंत्रक यांच्या कार्यकाळात शासकीय परिवहन सेवेत गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १ डिसेंबर, २०२१ रोजी चौकशीचे आदेश दिले होते,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०२-०६-२०२२) :** (१) जी.टी.एस. वाहन चालक संघटनेने दिनांक २४ नोव्हेंबर, २०२१ रोजी मा.उप मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदन वजा तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालिन संचालक, शासकीय परिवहन सेवा तथा उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीच्या अनुषंगाने तत्कालिन नियंत्रक श्री.गायकर यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(२) व (३) होय. प्रस्तुत प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार प्रशासकीय स्वरुपांच्या दोषारोपांची निश्चिती करून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्हयातील ग्रामीण भागातील शेत व पाणंद रस्त्यांच्या कामांना मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) १२१०२ (३०-०३-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयातील ग्रामीण भागातील शेत व पाणंद रस्त्याची निर्मिती करण्यासाठी जिल्हयातील ५१६ ग्रामपंचायतीचे अंदाजे ४,४६७ कि.मी. चे रस्ते मंजूरीसाठी जिल्हा परिषद, परभणी मार्फत सन २०२१-२०२२ दरम्यान प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामांची तालुकानिहाय थोडक्यात माहिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कामांना मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (२०-०५-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) तालुकानिहाय तक्ता

| तालूका | ग्रामपंचायतीची संख्या | एकूण कामांची संख्या | लांबी (कि.मी.) |
|---|---|---|---|
| गंगाखेड | ५६ | ३२३ | ६८६.५० |
| जिंतुर | ११९ | ५९६ | ९४५.०० |
| मानवत | ४९ | २८९ | ५३९.११ |
| पालम | ३९ | १६२ | २५०.६५ |
| परभणी | ५९ | २०२ | ४५२.०० |
| पाथरी | ४२ | २०६ | ३५४.९० |
| पुर्णा | ५७ | ३२५ | ४९९.०० |
| सेलु | ५८ | २०५ | ३६५.६५ |
| सोनपेठ | ३७ | २१४ | ३७४.६५ |
| एकूण | ५१६ | २५२२ | सुमारे ४४६७ |

(३) शासन निर्णय दिनांक २५/०१/२०२२ व शासन निर्णय दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेचे परभणी जिल्हाचे अनुक्रमे सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षाचे आराखडे मंजूर करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सहायक प्राध्यापकांच्या पदोन्नती नियमातील सुधारणा प्रलंबित असल्याबाबत

**(१५) १२६१९ (३०-०३-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहायक प्राध्यापकांच्या पदोन्नतीचे स्थान निश्चितीचे नियम अद्यापही यूजीसीनुसार करण्यात आलेले नाहीत, तसेच प्राध्यापकांच्या पदोन्नतीबाबत अनियमितता असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदोन्नतीच्या नियमात सुधारणा व्हावी व पदोन्नतीची कार्यवाही समितीवर अवलंबून न ठेवता प्राध्यापकांच्या पात्रतेपासून त्यांची स्थान निश्चिती करावी यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सहायक प्राध्यापकांच्या पदोन्नतीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.उदय सामंत (०२-०६-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३)

अकृषी विद्यापीठे व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नासंदर्भात लोकप्रतिनिधी व विविध संघटना यांच्याकडून प्राप्त निवेदने विचारात घेऊन सदर प्रलंबित प्रश्नाच्या संदर्भात शासनास शिफारस करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०७/१०/२०२१ अन्वये संचालक, उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोणार पर्यटन स्थळाच्या विकासाबाबत

**(१६) १२८४६ (३०-०३-२०२२) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार पर्यटन स्थळाच्या विकासाबाबत अनेक वेळा घोषणा होऊनसुद्धा अद्याप कोणतीच कार्यवाही न झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार लोणार पर्यटन स्थळाच्या विकासाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२३-०५-२०२२) :** (१) व (२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय दिनांक ३१/०३/२०१७ अन्वये लोणार सरोवर पर्यटन विकासाच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली असून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून लोणार येथे कामे प्रगती पथावर आहेत.

रिट याचीका क्रमांक ४५४९/२००९ अंतर्गत मा.उच्च न्यायालय मुंबई (खंडपिठ-नागपूर) यांनी दिनांक २८/०७/२०२१ व दिनांक ११/०८/२०२१ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार शासन निर्णय दिनांक २४/०८/२०२१ अन्वये लोणार सरोवराचे जतन, संवर्धन आणि विकासाकरीता विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षेखाली “लोणार सरोवर विकास समिती” स्थापन करण्यात आली आहे.

सदर समितीमार्फत लोणार सरोवराचे जतन, संवर्धन, संरक्षण आणि विकास करण्यासाठी प्रारुप आराखड्यासंबंधी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २०/१२/२०२१ व दिनांक ११/०४/२०२२ रोजी बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील व राज्यातील शहरी भागांतील विवाहितांचा हुंड्यासाठी होणार छळ व गुन्हा रोखण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही.

**(१७) १३१३१ (३०-०३-२०२२) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये गेल्या वर्षभरात हुंड्यासाठी विवाहितांच्या मानसिक, शारीरिक छळाचे ७८५ गुन्हयांची नोंद पोलिसांच्या दप्तरी झाली असून ३३८ प्रकरणांचे निर्णय लावण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांसंबंधित ५ हजार ४९६ गुन्हयांची नोंद झाली असून ४ हजार ३३५ गुन्हयांचा निर्णय लावण्यात आला तर सन २०२० मध्ये हुंड्यासाठी छळ केल्या प्रकरणी ४५४ गुन्हयांची नोंद करण्यात आली होती, यात एका विवाहितेची हुंड्यासाठी हत्या करण्यात आली तर २३ जणींना जीव गमवावा लागला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहरातील व राज्यातील शहरी भागांतील विवाहितांचा हुंड्यासाठी होणार छळ व गुन्हे रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०६-०६-२०२२) :** (१) मुंबईमध्ये सन २०२१ मध्ये हुंड्यासाठी मानसिक शारीरिक छळाचे ७८५ गुन्हे नोंदवण्यात आले असून त्यापैकी ३५८ गुन्हे उघड झाले आहेत.

(२) सन २०२१ मध्ये महिला अत्याचार विरुध्द ५४९६ गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यापैकी ४३३५ गुन्हे उघड झाले आहेत.सन २०२० मध्ये हुंड्यासाठी छळ केल्या प्रकरणी ४५४ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. त्यापैकी हुंडाबळी संबंधित खुन १, हुंडाबळी संबंधित मृत्यू १२, हुंडाबळी संबंधित आत्महत्या २० आहेत.

(३) महिलांना मदतीकरीता प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला बीट मार्शल, महिला दक्षता समिती, पोलीस मित्र तसेच मोहल्ला कमिटी ची स्थापना करण्यात आली आहे. महिलांच्या संरक्षण व सुरक्षिततेसाठी शासन

मान्यताप्राप्त व खाजगी स्वयंसेवी संस्थांची मदत घेवून जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. कौटुंबिक अत्याचारास बळी पडलेल्या महिलांकरीता ट्रॉमा केअर सेंटर्स सुरू करण्यात आले आहेत. कौटुंबिक वाद मिटवण्याकरीता पोलीस स्टेशन आवारात समुपदेशन केंद्र कार्यान्वित करण्यात आली आहेत. प्रत्येक पोलीस ठाण्यात महिलांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेण्याकरीता महिला मदत कक्ष कार्यान्वित आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जत (ता.सांगली) जिल्ह्यातील कृषी कार्यालयात चार मंडल अधिकाऱ्यांची दोन पदे व कृषी सहाय्यकांची ९ रिक्त पदे भरण्याबाबत.

**(१८) १३२८१ (३०-०३-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील कृषी कार्यालयात चार मंडल अधिकाऱ्यांची पदे मंजूर असताना दोन पदे रिक्त असून कृषी सहाय्यकांची ९ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयातील रिक्त असलेल्या पदामुळे त्याचा परिणाम कृषी कार्यालयातील कामकाजावर होत आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त कार्यालयातील रिक्त असलेली पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०६-०६-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे,

तालुका कृषी अधिकारी, जत जि.सांगली कार्यालयाच्या अधिनस्त मंडल कृषी अधिकाऱ्यांच्या ४ मंजूर पदांपैकी ३ पदे भरलेली असून १ पद रिक्त आहे. तसेच कृषी सहाय्यकांच्या ४९ मंजूर पदांपैकी ३९ पदे भरलेली असून १० पदे रिक्त आहे.

(२) रिक्त असणाऱ्या काही पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे देवून कृषी विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र कृषी सेवा गट-अ संवर्गातील १९, महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गातील ६१ व गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील १२३ पदांवर पदभरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पदभरतीची जाहिरात दिनांक १८/०४/२०२२ रोजी विज्ञापित केली आहे.

कृषी पर्यवेक्षक संवर्गातील १८२ कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गात दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजीच्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आली असून त्यापैकी १ अधिकाऱ्यांस सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात पदस्थापना दिलेली आहे.

तसेच कृषी पर्यवेक्षक संवर्गातील ३५८ कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गात पदोन्नती देण्याकरीता सन २०२१-२०२२ च्या निवडसूचीस मान्यता प्राप्त झाली असून पदोन्नतीची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

कृषी पर्यवेक्षक आणि कृषी सहाय्यक संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे संबंधित विभागीय कृषी सहसंचालक यांचेस्तरावर भरण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याला केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्रालयाच्यावतीने परवडणारी घरे मंजूर करण्यात आल्याबाबत

**(१९) ३७०९० (०४-०१-२०१८) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याला केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्रालयाच्यावतीने १ लाख ४४ हजार १६५ परवडणारी घरे मंजूर करण्यात आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०५-०६-२०२२) :** (१) हे खरे आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) ऑगस्ट, २०१७ अखेरपर्यंत एकूण ६० प्रकल्पांतील १,६७,२२६ (त्यापैकी १,२१,५८१ EWS) घरकुलांना मंजूरी दिलेली होती.

सद्य:स्थितीत डिसेंबर, २०१९ पर्यंत ९७९ प्रकल्पांतील एकूण ११,६५,७२५ (९,८३,०७० EWS) घरकुले व घटक क्र.२ CLSS अंतर्गत १,८४,२१३ घरकुले अशा एकूण १३,४९,९३८ घरकुलांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) मंजूरी दिली आहे.

(२) केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) मंजूरी दिलेली घरकुले पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने केंद्र हिश्यापोटी रुपये ७४२.१७२ कोटी इतका निधी राज्य शासनास उपलब्ध करुन दिला असून, सदर निधी राज्य शासनाने राज्य सुकाणू अभिकरण (म्हाडा) यांना वितरीत केला आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत राज्य शासनाचा हिस्सा म्हणून रुपये १००४ कोटी इतका निधी अंमलबजावणी यंत्रणाना वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील बंद पडणाऱ्या मराठी शाळांची संख्या अधिक असल्याबाबत

**(२०) ४४६६१ (०५-१२-२०१८) श्री.अनिकेत तटकरे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बंद पडणाऱ्या मराठी शाळांची संख्या अधिक असून या शाळा वाचविण्यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने मा.मुख्यमंत्री वा मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे पत्र देऊन शाळा सुरु ठेवण्याबाबत विनंती केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील मराठी शाळा सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२७-०५-२०२२) :** (१) सदर पत्र विभागात आढळून येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.